पवित्र कुरआन - सुराह १३, आयात २२

त्यांची अवस्था अशी असते की आपल्या पालनकर्त्याच्या प्रसन्नतेकरिता संयमाने वागतात, नमाज कायम करतात, आमच्या दिलेल्या उपजीविकेतून उघड व गुप्तपणे खर्च करतात आणि वाईटाला भलाईने नाहीसे करतात, परलोकाचे घर त्याच लोकांसाठी आहे.

सुराह ८, आयात ३

जे नमाज कायम करतात आणि आम्ही त्यांना जे काही दिलेले आहे त्यातून (आमच्या मार्गात) खर्च करतात.

जे.के.पार्क परिवार, नंदुरबार

मोफत कुरआन मिळविण्यासाठी संपर्क - ९८९०५६९६५२

देशदूत

नंदुरबार जिल्हा



दुधाळे शिवारात अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

■ **नंदुरबार । दि.२। प्रतिनिधी**

तालुक्यातील दुधाळे शिवारातील सुंदर नगर व सत्यम नगर येथील निर्विकार महादेव मंदिरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची ३०० वी जयंती उत्साहात साजरी झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भागवत धनगर तर प्रमुख वक्ते म्हणून आदर्श शिक्षक दिनेश धनगर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्याबाईंच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिक्षक दिपक पाटील यांनी केले. यावेळी प्रा.रामकृष्ण सोनवणे यांनी अहिल्याबाईं होळकर यांच्या संघर्षाचा इतिहास मांडला. सोमनाथ सुर्यवंशी यांनी अहिल्याबाईंचा खडतर प्रवासाचे वर्णन केले. प्रमुख वक्ते आदर्श शिक्षक दिनेश धनगर यांनी आजच्या अहिल्यांबाईंनी मोबाईल, फेसबुक, इन्स्टाग्रामचा वापर कमी करुन वाचन संस्कृती जपली पाहिजे, असे आवाहन केले. भागवत धनगर यांनी मनोगतात नवनवीन व दर्जेदार कार्यक्रम करु शकतो असा विश्वास व्यक्त केला.आभार विशाल जगताप यांनी मानले.

स.स.प्र.ग्रस्तांसाठी ऑनलाईन सुनावणीची सुविधा

'ईज ऑफ लिव्हिंग' उपक्रम : जिल्हाधिकारी डॉ.मित्ताली सेठी यांची माहिती

■ **नंदुरबार । दि.२। प्रतिनिधी**

मुख्यमंत्री यांच्या १५० दिवसीय सहज आणि सोप्या जीवनशैली (ईज ऑफ लिव्हिंग) उपक्रमांतर्गत सरदार सरोवर प्रकल्पग्रस्त नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, आता या प्रकल्पांतर्गत होणाऱ्या सुनावण्या ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी कळविले आहे.

या अंतर्गत मुख्यतः अक्कलकुवा, धडगाव आणि तळोदा या तीन दुर्गम तालुक्यांतील प्रकल्पग्रस्तांना आता सुनावणीसाठी ८० ते ९० किलोमीटरचा प्रवास करण्याची आवश्यकता भासणार नाही. या भागातील नागरिक आर्थिकदृष्ट्या कमकुवत असून, वाहतुकीच्या साधनांचा अभाव आणि वेळेचा अपव्यय लक्षात घेता ऑनलाईन सुनावणीची सुविधा ही त्यांच्यासाठी मोठा दिलासा ठरणार आहे.

या नवीन सुविधेमुळे दावेदारांना आपल्या तालुक्याच्या तहसील कार्यालयातच ऑनलाईन सुनावणीत सहभागी होता येणार आहे. सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रे संबंधित तहसील कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार यांच्याकडे सादर करता येतील. सुनावणी दरम्यान दावेदारांच्या स्वाक्षऱ्या किंवा अंगठ्यांचे नमुने स्वतंत्र कागदावर घेऊन त्याच दिवशी संबंधित कागदपत्रांसह अपर जिल्हाधिकारी, सरदार सरोवर प्रकल्प कार्यालयाकडे सादर करण्यात येणार आहेत. तसेच, प्रत्येक दावेदारास तहसील कार्यालयामार्फत रीतसर नोटीस बजावण्यात येईल व तहसील कार्यालयातच ऑनलाईन सुनावणीसाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या सोयीसाठी व प्रशासनाच्या जवळीकासाठी उचललेले हे पाऊल या ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेला योग्य न्याय देणारे ठरणार आहे, असेही या प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

नवापूर आगाराला मिळाल्या पाच नव्या बसेस

'लालपरी'चा वर्धापन दिन उत्साहात

■ **नवापूर । श.प्र. -**

नवापूर येथे एसटीच्या ७७ वा वर्धापन दिनानिमित्त आ.शिरीष कुमार नाईक यांच्या हस्ते पाच नवीन बसेसचे उद्घाटन करण्यात येवून केक कापण्यात आला. आमदारांनीही एस.टी.बसमधून प्रवास करुन प्रवाशांना गुलाबपुष्प व पेढे देऊन शुभेच्छा दिल्या. दरम्यान, नवापूर आगाराला पाच नव्या बसेस मिळाल्या आहेत.

नवापूर येथील एसटी आगारातर्फे लालपरीचा ७७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. १ जून १९४८ रोजी पुणे अहिल्यानगर पुणे मार्गावर एसटी महामंडळाची पहिली बस धावली होती. त्या अनुषंगाने व सन्मानार्थ एसटी महामंडळाकडून दि.१ जून हा दिवस एसटी महामंडळाच्या वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. नवापूर बस स्थानकावर आरामदायी व सुरक्षित अशा ५ बसेस मिळाल्या आहेत. या बसेसचे उद्घाटन आ.शिरीष नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी नवीन बसेसचे पूजन व श्रीफळ फोडून उद्घाटन केले. त्यानंतर बसेसच्या प्रवेश द्वारावरील फीत कापून आमदारांनी एसटीत बसून प्रवास केला. यावेळी त्यांच्यासोबत नवापूर आगारप्रमुख विजय पाटील यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते. नवापूर बस स्थानकावर एसटीचे चित्र असलेला केक आ.नाईक यांनी कापून एसटीच्या वाढदिवस साजरा केला. प्रसंगी प्रवाशांना पेढे व गुलाब पुष्प देऊन आमदारांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी आ.शिरीष नाईक म्हणाले, एसटीचा प्रवास हा सुरक्षित व सुखाच्या प्रवास आहे. त्यामुळे प्रवाशांनी एसटीतून प्रवास करावा. चांगल्या बसेसच्या माध्यमातून एस टी महामंडळाने चांगली सेवा प्रवाशांना द्यावी असे आवाहन केले. यावेळी पोलीस निरीक्षक भाऊसाहेब लांडगे, आगार प्रमुख विजय पाटील, स्थानक प्रमुख रवींद्र जगताप, वाहतूक निरीक्षक श्री.नगराळे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक श्री.भोये, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक श्री.ठाकरे, ज्ञानेश्वर पवार, आगार लेखाकर श्री.गायकवाड आदी उपस्थित होते. येथील बसस्थानक केळीचे खांब व विविध फुलांनी सजविण्यात आले होते. एसटीचे चित्र असलेले मोठी रांगोळी प्रवाशांचे लक्ष वेधून घेत होती. नवापूर एसटी आगाराला आरामदायी व विविध सुविधा असलेल्या नवीन पाच बसेस मिळाल्याने प्रवाशांनी आनंद व समाधान व्यक्त केले आहे.

विखरण येथे पाठलाग करुन २ लाखांचे बोगस बियाणे जप्त

जिल्ह्यात आतापर्यंत १० लाखांची बोगस बियाणे जप्त, भरारी पथकांची कारवाई

■ **सारंगखेडा । दि.२। वार्ताहर -**

पावसाळयाच्या तोंडावर शेतकऱ्यांची आता शेती कामाची लगबग सुरू आहे. बाजारात बियाणे देखील विक्रीसाठी दाखल झाले आहेत. अशातच बोगस बियाण्यांचा सुळसुळाट देखील सुरू झाला असल्याचे उघड झाले आहे.नंदुरबार जिल्ह्यात महिन्याभरात चार ठिकाणी बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांचा पर्दाफाश केला असून जिल्हा कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी डमी ग्राहक बनून कापसाचे बोगस बियाणे जप्त केले आहे. दरम्यान, विखरण ता.नंदुरबार येथे सिनेस्टाईल पाठलाग करून कृषी विभागाच्या पथकाने २ लाख रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे . आतापर्यंची या खरीप हंगामातील सलग चौथी कारवाई आहे. त्यामुळे अनधिकृतरित्या बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

खरीप हंगाम आता तोंडावर आहे. यामुळे शेती कामांना वेग आला असून शेतकऱ्यांची देखील आता शेती तयार करणे आणि बियाणे खरेदीची धावपळ सुरू झाली आहे. दरम्यान, बागायतदार शेतकरी मान्सून पूर्व कापसाची लागवड करत असल्याने बियाणे खरेदी करु लागले आहे. मात्र कापसाचे प्रतिबंधित असलेल्या बियाणे विक्रीसाठी आणले जात आहे. शनिवारी रात्री नंदुरबार तालुक्यातील विखरण येथे कृषि विभागाची धडक कार्यवाहीत अंदाजित २ लाख रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सिनेस्टाईल पाठलाग करून कृषी विभागाच्या पथकाने ही कारवाही केली आहे. आतापर्यंतची जिल्ह्यातील या खरीप हंगामातील सलग चौथी कारवाईमुळे अनाधिकृतरित्या बोगस बियाणे विक्री करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे. पुणे विभागातील कृषी संचालक गुण नियंत्रक सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर, जिल्हा कृषी अधिक्षक चेतन ठाकरे, कृषी विकास अधिकारी किशोर हडपे, नाशिक तंत्र गुणवत्ता नियंत्रण निरिक्षक उल्हास ठाकूर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली मिळालेल्या गुप्त खबरीनुसार नंदुरबार तालुक्यांतील विखरण २ लाख, शहादा तालुक्यातील कहाटूळ २ ठिकाणी ५ लाख , नंदूरबार येथे ३ लाख आदी चार ठिकाणी तब्बल १० लाख रुपयांचे प्रतिबंधित संशयित एचटीबीटी बोगस कापुस बियाणेची पाकीटे जप्त करण्यात आली आहेत. तंत्र अधिकारी गुण नियंत्रण नाशिक विभाग उल्हास ठाकूर , जिल्हा नियंत्रण निरिक्षक स्वप्नील शेळके, मोहीम अधिकारी सचिन देवरे, कृषी अधिकारी प्रकाश खरमाळे, कृषी अधिकारी योगेश हिवराळे, कृषि अधिकारी महेश विसपुते यांच्या पथकाने गोपनिय माहिती, डमी ग्राहकाचा वापर करून पाळत ठेवून प्रतिबंधित कापूस बियाणे विक्री करत असताना रंगेहाथ पकडले आहे.

उत्पादक कंपनीच्या विरोधात शहादा, नंदुरबार तालुका पोलीस ठाण्यात बियाणे कायदा १९६६, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व जीवनावश्यक वस्तू कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईसाठी कृषी जिल्हा अधिक्षक चेतन ठाकरे, कृषी जिल्हा अधिक्षक किशोर हडपे, कृषि विकास अधिकारी, तंत्र गुणवत्ता नियंत्रण अधिकारी उल्हास ठाकूर, गुणवत्ता निमंत्रण अधिकारी कल्याण पाटील यांनी मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांनी खरीप पिकाच्या लागवडीसाठी शेती मशागतीस सुरुवात केली आहे . यासाठी शेतकरी बियाण्यांच्या शोधात आहेत. अशा वेळी शेतकऱ्यांची फसवणूक होण्याची शक्यता असते. प्रतिबंधित एचटीबीटी कापूस बियाणे विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विरोधात गय केली जाणार नाही. कृषी सेवा केद्राच्या तपासणीसाठी भरारी पथकाची स्थापना केली आहे.

अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त म्हसावद ग्रा.पं.तर्फे कर्तबगार महिलांचा सत्कार

■ **म्हसावद । वार्ताहर-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत म्हसावद येथे गावातील कर्तबगार महिलांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांना प्रमाणपत्र, ट्रॉफी आणि ५०० रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

आरोग्य सेविका रत्ना अशोक धनगर, अंगणवाडी सेविका मंगला मिठ्या पावरा, आशा वर्कर सुरेखा दौलत खंडेराय, महिला बचत गट अध्यक्ष अल्का सचिन गवळे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सरपंच युवराज ठाकरे होते. उपसरपंच सौ. सविता पाटील, ग्रामविकास अधिकारी बी.पी.गिरासे, ग्रामपंचायत सदस्य आणि मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी गावातील अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, तसेच महिला बचत गटांच्या प्रमुख यांचीही उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमात डॉ.रजनीकांत सूर्यवंशी यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्य, समाजसेवा आणि नेतृत्व गुणांविषयी मनोगत व्यक्त करत उपस्थितांना प्रेरणा दिली.

कार्यक्रमाची सांगता करताना सर्व मान्यवरांनी महिलांच्या

तळोदा मराठा समाज युवा मंडळाच्या अध्यक्षपदी विश्वजीत फोके

■ **चिनोदा । वार्ताहर**

तळोदा येथील मराठा समाज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची तळोदा मंगल कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी मराठा युवा मंडळाची तळोदा शहर नवीन कार्यकारिणी गठित करण्यात आली. यात मराठा समाज युवा मंडळाच्या अध्यक्षपदी विश्वजीत फोके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

उपाध्यक्षपदी राजेश जाधव, सचिव संतोष पडोळे, खजिनदार गणेश गायकवाड, संचालक गणेश शिंदे, प्रशांत गाढे, आनंद शिंदे, दिगंबर बोराडे, मनोज आभळे, उमेश पवार, देवेंद्र साळुंखे, सागर मराठे, चेतन चव्हाण, गणेश गाढे, रुपेश शिंदे यांची निवड करण्यात आली. संस्थेचे सचिव महेंद्र गाढे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष नवनीत शिंदे, कोषाध्यक्ष प्रा.एम. ओ.पवार, संचालक दिलीप जगदाळे, शिवाजीराव भवर, अशोक चव्हाण, सुभाष शिंदे, अनिल शिंदे, राजू गाढे, दिनेश फोके, तळोदा कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक रविंद्र गाढे, धनराज शिंदे आदी समाज उपस्थित होते.

गटारीजवळच पाण्याच्या पाईपलाईनचे लिकेज

तोरखेडा ग्रामपंचायत प्रशासनाचा ढिसाळ कारभार

■ **तोरखेडा । वार्ताहर -**

तोरखेडा येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होताना दिसत आहे.

तोरखेडा ता.शहादा येथील ग्रामपंचायत प्रशासनाने गावात होणाऱ्या विविध समस्यांकडे दुर्लक्ष केले आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसांपासून पोलीस लाईनच्या मागील गटारी जवळ लिकेज झाल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. त्याच्या बाजूला गावातील सांडपाण्याच्या गटारदेखील आहे. महादेव मंदिराजवळ सुद्धा पाण्याची पाईपलाईन फुटल्याने तिथे देखील लिकेज झालेला आहे. ग्रामस्थांनी बऱ्याच वेळी ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांच्या कानावर टाकून देखील या वाया जाणाऱ्या पाण्याचा बंदोबस्त आतापर्यंत न केल्याने हजारो लिटर पाणी वाया जात आहे. तसेच लिकेज गटारी जवळ असल्याने गटारीचे पाणी पिण्याच्या पाईपात गेले तर गावातील बऱ्याच नागरिकांना साथीचे आजार होण्याची दाट शक्यता नाकारता येणार नाही.

ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवकसुद्धा आठ आठ दिवसांनी एकदा येतो. केव्हा येतो आणि केव्हा जातो याची खबर ग्रामस्थांना लागत नाही. मग गावात होणाऱ्या समस्यांबद्दल तक्रार कोणाजवळ करायची? तोरखेडा गावचा विकास गेल्या दहा वर्षापासून खुंटलेला आहे. त्यातच कुणी कुठे काय टाकून जाते, गावात होणाऱ्या समस्या आणि घाणीकडे कोणाचेही लक्ष लागत नसल्याने सर्वत्र गावात ग्रामपंचायत प्रशासनाबद्दल हळूहळू व्यक्त होताना दिसत आहे. तालुक्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या गोष्टींकडे लक्ष घालणे गरजेचे आहे.

मोबाईलची रेंज मिळविण्यासाठी उंच झाडांचा आधार

गमन, बामणी परिसरात मोबाईल रेंजअभावी ऑनलाईनची कामे रखडली

■ **मोलगी । वार्ताहर -**

अक्कलकुवा तालुक्यातील नर्मदा परिसरातील गमन व बामणी येथे मोबाईलला रेंज मिळत नसल्याने मोबाईलधारक रेंज मिळवण्यासाठी चक्क झाडावर चढून उंचावरील फांद्यांचा आधार घेत मोबाईलची रेंज मिळवत ऑनलाईनची कामे करतांना दिसत आहेत. या भागात मोबाईलचे मनोरे उभे आहेत. मात्र मनोरे बांधल्यापासून वीजेअभावी कायम बंदच आहेत. त्यामुळे मोबाईल मनोरे सुरु ठेवण्यासाठी सोलर पॅनल बसविण्याची मागणी मोबाईल धारकांनी केली आहे.

अक्कलकुवा तालुक्यातील नर्मदा परिसरातील गमन व बामणी येथे मोबाईलला रेंज मिळत नसल्याने मोबाईलधारक त्रस्त झाले आहेत. मोबाईलची रेंज कुठे आणि कशी मिळेल याच्या शोधात असतात.

या परिसरात मोबाईलला रेंजसाठी मनोरे उभे करण्यात आले. मात्र ते शो पीस ठरत असून ते कायमच बंद असल्याची तक्रार मोबाईलधारक ग्राहक करीत आहेत. मोबाईल रेंजअभावी ऑनलाईनची कामे करण्यासाठी अडचणी येत असल्याने रेंज मिळविण्यासाठी मोबाईल धारक चक्क झाडावर चढून झाडाच्या उंचावरील फांद्यांचा आधार घेत ऑनलाईन कामे करतांना दिसून येतात. या परिसरात उभे करण्यात आलेले सर्वच कंपनीचे मनोरे पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करुन मोबाईलला पुरेशी रेंज उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी नर्मदा काठाच्या गमन बामणी येथील मोबाईलधारक ग्राहकांनी केली आहे.

भुईमूग काढणीसाठी शेतकऱ्यांचे 'वर्क फ्रॉम होम'

■ **चिनोदा । वार्ताहर -**

तळोदा तालुक्यातील रांझणी, रोझवा पुनर्वसन, जीवननगर पुनर्वसनसह परिसरात मोठ्या प्रमाणावर भुईमुगाची पेरणी करण्यात आली होती. भुईमूग पीक परिपक्व होऊन काढणी सुरू असतांना गेल्या पंधरा-वीस दिवसांपासून सतत होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची समस्या चांगलीच वाढली आहे. पावसाच्या शक्यतेमुळे शेतकरी सकाळी लवकर शेतात जावून भुईमुगाची रोप उपटवून घरी जाणत असून शेडमध्ये त्यातून शेंगा वेगळया करतांना दिसत आहेत. सतत होत असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकरी कुटुंबातील पुरुष, तरुण, बालके यांच्याकडून सकाळच्या प्रहरी शेत गाठून भुईमूग पीक उपटून बैलगाडी, मोटरसायकल यावर बांधून वाहतूक करीत आपापल्या घरी आणण्यात येत असून घराजवळील मांडव, पत्र्याचे शेड येथे टाकून दिवसभर कुटुंबातील सर्वजण भूईमुगाच्या शेंगा तोडणी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे परिसरात शेतकऱ्यांचे वर्क फ्रॉम होम सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान परिसरात भुईमूग पिक चांगल्या अवस्थेत होते. एकरी उत्पन्न, भावही चांगला येणार असा अंदाज होता. परंतू सततच्या पावसाने चांगलेच नुकसान केले असून अद्यापही मोठ्या प्रमाणावर भुईमूग काढणी बाकीच असून शेतकऱ्यांकडून भूईमूग काढणीस वेग देण्यात येत आहे.

सकाळी लवकर शेतात जाऊन भुईमूग पीक उपटवून आणण्यास प्राधान्य देत असून दिवसभर कुटुंबातील सदस्य शेंगा तोडणीचे काम करीत आहेत. त्यामुळे शेंगा, भुईमुगाच्या चाऱ्याचेही नुकसान होत नसून भुईमुगाला भाव व गुरांचा चारा चांगला राहण्यास मदत होणार आहे, असे रोझवा पुनर्वसन येथील शेतकरी जुहऱ्या पावरा यांनी सांगितले.